# परिशिष्ट - अ

दि.२५/४/२०२४

प्रति,

मा. सहाय्यक संस्था निबंधक सो,

जळगांव,विभाग जळगांव

ता.जि.जळगांव.

विषय :- संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी बाबत...

संस्थेचे नांव :- चैतन्य आयुर्वेद महाविद्यालय माजी विद्यार्थी संस्था,साकेगांव, ता.भुसावळ,जि.जळगांव

महोदय,

निवेदन करण्यात येते की, विषयात नमुद केलेल्या संस्थेची संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी करावयाची आहे. सबब आपणाकडे खालील कागदपत्र सादर करण्यात येत आहे.

१) विधानपत्र (ज्ञापन) (मेमोरॅन्डम ऑफ असोसिएशन) ची सत्य प्रत
२) विश्वस्त व्यवस्थेचा हेतू व नियम-नियमावली ची सत्यप्रत
३) संस्था नोंदणी संदर्भात कार्यकारी मंडळाचे सर्व सभासदांचे संमतीपत्र
४) संस्था नोंदणी बाबत कार्यकारी मंडळाच्या सर्व सभासदांचे सहीनिशी अधिकारपत्र
५) प्रोसिडींग बुकाची ठरावाची नक्कल (झेरॉक्स प्रत)
६) संस्थेच्या पत्याबाबत व मालमत्तेबाबत अध्यक्षांचे/सचिवांचे प्रतिज्ञापत्र
७) कार्यालयाचे जागेचे मालकाचे ना-हरकत प्रमाणपत्र व जागेचा उतारा
८) लकी ड्रॉ हमीपत्र
९) जाहिरात फि माफीचा अर्ज

मी पुढे असे नमुद करतो की, वरील संस्थेचे सर्व उद्देश १८६० च्या संस्था नोंदणी अधिनियमांच्या कलम २० अन्वये असून वरील संस्थेच्या नावाची नामसदृश्य असलेली अन्य संस्था माझे उत्तम माहिती प्रमाणे आमचे परिसरात अस्तित्वात नाही. नोंदणी शुल्क रूपये ५०/- (अक्षरी रूपये पन्नास मात्र) मी भरण्यास तयार आहे. तरी कृपया वरील संस्था नोदणी अधिनियम १८६० अन्व्ये त्वरीत नोंदवावी अशी विनंती आहे.

**संलग्न - वरील प्रमाणे**

अर्जदार

[signature]

श्री.प्रसन्न विलास भालेराव

(m) 30/04/24

कनिष्ठ लिपीक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
जळगांव विभाग जळगांव

Scanned with CamScanner

# संमती पत्र

प्रति,

मा. सहाय्यक धर्मदाय आयुक्त,

जळगांव विभाग,जळगांव.

महोदय,

श्री. प्रसन्न विलास भालेराव यांनी चैतन्य आयुर्वेद महाविद्यालय माजी विद्यार्थी संस्था, साकेगांव,ता.भुसावळ,जि.जळगांव यांनी संस्था नोंदविण्यासाठी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये दि. / /२०२४ रोजी अर्ज सादर केला आहे. त्या अर्जातील सर्व माहिती खरी आहे. मला/आम्हाला त्यासंबंधी जास्त काही सांगावयाचे नाही. सदर अर्जाच्या सुनावणीच्या स्वतंत्र नोटीस काढण्याची आवश्यकता नाही. नोंदणी विषयक प्रमाणपत्र अर्जदारांचे नांवे देण्यास माझी/आमची कोणतीही हरकत नाही. कळावे. आपले.

| अ.नं. | सभासदांचे नांव | सह्या |
|---|---|---|
| १. | श्री. महेशकुमार निळकंठ चौधरी | [signature] |
| २. | श्री. भुषण पुंडलिक लोखंडे | [signature] |
| ३. | श्री. प्रसन्ना विलास भालेराव | [signature] |
| ४. | श्री. सारंग किशोर फालक | [signature] |
| ५. | श्री. मनिष प्रल्हाद फालक | [signature] |
| ६. | श्री. हर्षल प्रकाश पाटील | [signature] |
| ७. | श्रीमती सौ. सेजल अशोक पाटील | [signature] |
| ८. | श्री. रोशन शंकर ढाके | [signature] |
| ९. | श्री. गणेश लिलाधर भोळे | [signature] |
| १०. | श्रीमती. खुशबु रहेमान तडवी | [signature] |
| ११. | श्री. अमोलसिंह चंद्रसिंह चव्हाण | [signature] |

स्थळ-

दि. २७/८/२०२४

[signature]

अर्जदार

# विधान पत्र - १

## चैतन्य आयुर्वेद महाविद्यालय माजी विद्यार्थी संस्था,साकेगांव,ता.भुसावळ,जि.जळगांव

**(१) संस्थेचे नांव :** चैतन्य आयुर्वेद महाविद्यालय माजी विद्यार्थी संस्था,साकेगांव,ता.भुसावळ, जि.जळगांव

**(२) संस्थेच्या कार्यालयाचा पत्ता :** श्री. महेशकुमार निळकंठ चौधरी
रा.सि.स.नं.३८७३/२२,म्युनिसिपल पार्क,भुसावळ,ता.भुसावळ,जि.जळगांव.

**(३) संस्थेचे उद्देश :**

१. चैतन्य आयुर्वेद महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना संघटित करणे

२. प्रवेशित व माजी विद्यार्थ्यांतील गरिब व होतकरु विद्यार्थ्यांना संस्थेच्या माध्यमातुन शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन देणे

३. सर्व माजी विद्यार्थ्यांना एकत्र करुन त्यांच्या शिक्षणाच्या व कामाच्या अनुभवाच्या बाबतीत व्याख्यानमाला आयोजित करणे.

४. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये महाविद्यालयातील प्राचार्य,प्राध्यापक व इतर कर्मचारी यांच्याबद्दल आदर व आदर्श निर्माण करणे

५. सर्व आजी व माजी विद्यार्थ्यांना एकत्रित करुन तज्ञ व्यक्तिच्या/ वैद्यकीय अधिकारीच्या /डॉक्टरांच्या मदतीने आरोग्य निदान शिबीर,रक्तदान शिबीर, आजारांबद्दल जागरुकता शिबीर, एडस् निर्मुलन व्याख्यान इत्यांदीचे आयोजन करणे.

६. सर्व महाविद्यालयातील आजी व माजी विद्यार्थ्यांना एकत्रित करुन विद्यार्थ्यांच्या सामाजिक व शैक्षणिक समस्या सोडविण्याचा प्रयत्न करणे.

७. विद्यार्थी व पालकांमधला वैचारिक मतभेद,जनरेशन गॅप दुर करण्यासाठी महाविद्यालयातील आजी व माजी विद्यार्थ्यांच्या मदतीने कार्यक्रम आयोजित करुन मार्गदर्शन करणे.

८. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना व्यसनांपासुन दुर राहण्यासाठी तज्ञ व्यक्तिच्या व डॉक्टरांच्या मदतीने व्याख्यानमाला आयोजित करणे.

९. सर्व महाविद्यालयातील आजी व माजी विद्यार्थ्यांना एकत्रित करुन आरोग्य,पर्यावरण, शिक्षण व संशोधनाविषयी आवड निर्माण करण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करणे.

१०. मुला-मुलींमध्ये एडस् निर्मुलनाविषयी जनजागृती निर्माण करणे

११. उत्तीर्ण विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्ध करण्यासाठी माजी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन घेणे व तत्सम कार्यक्रम आयोजित करणे

१२. विभागातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व गुणगौरव करणे

१३. आजी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन करणेसाठी माजी विद्यार्थ्यांचे व्याख्यान आयोजित करणे.

अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव

Scanned with CamScanner

चैतन्य आयुर्वेद महाविद्यालय माजी विद्यार्थी संस्था,साकेगांव,ता.भुसावळ,जि.जळगांव संस्थेचे नियम नियमावली प्रमाण ज्या कार्यकारी मंडळावर सदरहु संस्थेची व्यवस्था वा कारभार सोपविण्यात आला आहे. अशा संस्थापक सभासदांचे संपुर्ण नांवे,पत्ते,हुद्दे,व्यवसाय व राष्ट्रीयत्व खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | नांव | वय | व्यवसाय | हुद्दा | राष्ट्रीयत्व |
|---|---|---|---|---|---|
| १. | **श्री. महेशकुमार निळकंठ चौधरी**<br>रा. ७/४०४,म्युनिसिपल पार्क,भुसावळ,ता.भुसावळ | ४८ | नोकरी | अध्यक्ष | भारतीय |
| २. | **श्री. भुषण पुंडलिक लोखंडे**<br>रा. गणेश कॉलनी,भुसावळ,ता.भुसावळ | ५१ | वैद्यकीय | उपाध्यक्ष | भारतीय |
| ३. | **श्री. प्रसन्न विलास भालेराव**<br>रा. संतोषीमाता नगर,पहुरपेठ,ता.जामनेर | ३३ | नोकरी | सचिव | भारतीय |
| ४. | **श्री. सारंग किशोर फालक**<br>रा. ५/५३३,हनुमान नगर,भुसावळ,ता.भुसावळ | ४० | नोकरी | सदस्य | भारतीय |
| ५. | **श्री. मनिष प्रल्हाद फालक**<br>रा. आनंद नगर,जामनेर रोड,भुसावळ,ता.भुसावळ | ४६ | नोकरी | सदस्य | भारतीय |
| ६. | **श्री. हर्षल प्रकाश पाटील**<br>रा. मु.पो.हिंगोणे,ता.यावल,जि.जळगांव | ३६ | नोकरी | सदस्य | भारतीय |
| ७. | **श्रीमती. सेजल अशोक पाटील**<br>रा. प्लॉट नं.३२,नंदनवन कॉलनी,भुसावळ | ३२ | नोकरी | सदस्य | भारतीय |
| ८. | **श्री. रोशन शंकर ढाले**<br>रा. बुलढाणा रोड,मलकापुर,जि.बुलढाणा | ३२ | नोकरी | सदस्य | भारतीय |
| ९. | **श्री. गणेश लिलाधर भोळे**<br>रा. घर नं.३६०,साकेगांव,ता.भुसावळ,जि.जळगांव | ४७ | वैद्यकीय | सदस्य | भारतीय |
| १०. | **श्रीमती. खुशबु रहेमान तडवी**<br>रा. प्लॉट नं.३६,लक्ष्मीनारायण नगर,भुसावळ | ३१ | नोकरी | सदस्य | भारतीय |
| ११. | **श्री. अमोलसिंह चंद्रसिंह चव्हाण**<br>रा. मु.पो.नाडगांव,ता.बोदवड,जि.जळगांव | ४० | नोकरी | सदस्य | भारतीय |

अध्यक्ष　　　　उपाध्यक्ष　　　　सचिव

Scanned with CamScanner

आम्ही खालील सह्या करणार **चैतन्य आयुर्वेद महाविद्यालय माजी विद्यार्थी संस्था,साकेगांव, ता.भुसावळ,जि.जळगांव** संस्थेचे सदस्य जाहिर करीतो की, संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये अभिप्रेत केलेली संस्था अस्तित्वात आणण्याची आमची इच्छा असून वरील उद्देशाने आम्ही एकत्र येवून **चैतन्य आयुर्वेद महाविद्यालय माजी विद्यार्थी संस्था,साकेगांव,ता.भुसावळ, जि.जळगांव** संस्था आज दिनांक / /२०२४ रोजी स्थापन केली असून ती संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी करण्यासाठी आम्ही या विधानपत्रावर सह्या केल्या आहेत.

| अ.नं. | सभासदांचे नांव व पत्ते | सह्या |
|---|---|---|
| १. | **श्री. महेशकुमार निळकंठ चौधरी**<br>रा. ७/४०४,म्युनिसिपल पार्क,भुसावळ,ता.भुसावळ | Chaudhari |
| २. | **श्री. भुषण पुंडलिक लोखंडे**<br>रा. गणेश कॉलनी,भुसावळ,ता.भुसावळ | BPLokhande |
| ३. | **श्री. प्रसन्ना विलास भालेराव**<br>रा. संतोषीमाता नगर,पहुरपेठ,ता.जामनेर | [signature] |
| ४. | **श्री. सारंग किशोर फालक**<br>रा. ५/५३३,हनुमान नगर,भुसावळ,ता.भुसावळ | Sarang |
| ५. | **श्री. मनिष प्रल्हाद फालक**<br>रा. आनंद नगर,जामनेर रोड,भुसावळ,ता.भुसावळ | Phalak |
| ६. | **श्री. हर्षल प्रकाश पाटील**<br>रा. मु.पो.हिंगोणे,ता.यावल,जि.जळगांव | [signature] |
| ७. | **श्रीमती. सेजल अशोक पाटील**<br>रा. प्लॉट नं.३२,नंदनवन कॉलनी,भुसावळ | [signature] |
| ८. | **श्री. रोशन शंकर ढाके**<br>रा. बुलढाणा रोड,मलकापुर,जि.बुलढाणा | [signature] |
| ९. | **श्री. गणेश लिलाधर भोळे**<br>रा. घर नं.३६०,साकेगांव,ता.भुसावळ,जि.जळगांव | [signature] |
| १०. | **श्रीमती. खुशबु रहेमान तडवी**<br>रा. प्लॉट नं.३६,लक्ष्मीनारायण नगर,भुसावळ | Kadevi |
| ११. | **श्री. अमोलसिंह चंद्रसिंह चव्हाण**<br>रा. मु.पो.नाडगांव,ता.बोदवड,जि.जळगांव | [signature] |

**स्थळ :-**

दि. / /२०२४

**वरील सर्व सह्या करणाऱ्यांना मी ओळखतो**
**माझ्या समक्ष सह्या केल्या आहे.**

Scanned with CamScanner

परिशिष्ट क - १

# चैतन्य आयुर्वेद महाविद्यालय माजी विद्यार्थी संस्था साकेगांव,ता.भुसावळ,जि.जळगांव

## नियम व नियमावली

नियमावलीतील संदर्भिय शब्दांची व्याख्या -

संस्था - चैतन्य आयुर्वेद महाविद्यालय माजी विद्यार्थी संस्था,साकेगांव,ता.भुसावळ, जि.जळगांव असे समजण्यात येईल.

अध्यक्ष - चैतन्य आयुर्वेद महाविद्यालय माजी विद्यार्थी संस्था,साकेगांव,ता.भुसावळ, जि.जळगांव या संस्थेचा अध्यक्ष असे समजण्यात येईल.

उपाध्यक्ष - चैतन्य आयुर्वेद महाविद्यालय माजी विद्यार्थी संस्था,साकेगांव,ता.भुसावळ, जि.जळगांव या संस्थेचा उपाध्यक्ष असे समजण्यात येईल.

सचिव - चैतन्य आयुर्वेद महाविद्यालय माजी विद्यार्थी संस्था,साकेगांव,ता.भुसावळ, जि.जळगांव या संस्थेचा सचिव असे समजण्यात येईल.

कार्यकारी मंडळाचा सभासद - चैतन्य आयुर्वेद महाविद्यालय माजी विद्यार्थी संस्था,साकेगांव, ता.भुसावळ,जि.जळगांव या संस्थेच्या कार्यकारी मंडळात असलेला सभासद असे समजण्यात येईल.

सर्वसाधारण सभेचा सभासद - चैतन्य आयुर्वेद महाविद्यालय माजी विद्यार्थी संस्था,साकेगांव, ता.भुसावळ,जि.जळगांव या संस्थेच्या कोणत्याही प्रकारचा सभासद म्हणजे त्याला सर्वसाधारण सभेचा सभासद असे समजण्यात येईल.

१. संस्थापक सदस्य :- केवळ विधानपत्रावर सह्या करणाऱ्या सदस्यांना संस्थापक सदस्य असे म्हटले जाईल.

२. कार्यक्षेत्र :- या संस्थेचे कार्यक्षेत्र संपुर्ण महाराष्ट्र पुरते मर्यादित राहील.

३. हिशोब वर्ष :- या संस्थेचे हिशोब वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च अखेर असे राहील.

अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव

Scanned with CamScanner

४. **सभासद व त्यांची नोंदणीची पध्दत :-**

कोणत्याही वय वर्षे १८ चे वरील असलेल्या भारतीय स्त्री/पुरूष जो चैतन्य आयुर्वेद महाविद्यालय, साकेगांव,ता.भुसावळ,जि.जळगांव येथील माजी विद्यार्थी तसेच तेथील प्राध्यापक असेल त्याना संस्थेचे सभासदत्व प्राप्त करता येईल. त्या करीता त्याला/तिला संस्थेचे अध्यक्ष/सचिव यांचेकडे रितसर अर्ज करावा लागेल. आलेल्या अर्जाला कार्यकारी मंडळाने मंजूरी दिल्यावर सभासदांची निर्धारीत वर्गणी संस्थेत जमा केल्यानंतर त्याची/तिची नोंदणी सभासद यादी मध्ये करण्यात येईल. अर्ज मंजूर अगर नामंजूर करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील.

५. **सभासदांचे प्रकार** - सभासदांचे प्रकार पुढील प्रमाणे असतील.

१. **आजीवन सभासद** - संस्था नोंदणी झालेनंतर आजीवन सभासदत्वासाठी संस्थेला रूपये २०००/- एक रक्कमी एकदाच देणारे सभासदांना आजीवन सभासद म्हटले जाईल.

२. **साधारण सभासद** - संस्थेला रूपये ५००/- दरवर्षी देणारे व्यक्तिला वार्षिक साधारण सभासद म्हणुन समजण्यात येईल.
(मतदानाचा किंवा निवडणुकीत उभे राहण्याचा अधिकार नाही)

३. **संस्थापक सभासद** - संस्थेला रूपये ५०१/- एक रक्कमी एकदाच देणारे व विधानपत्रावर सह्या करणाऱ्या सभासदांना संस्थापक सभासद म्हटले जाईल.

टिप- संस्थेस केवळ देणगी दिल्यामुळे संस्थेचे सभासदत्व प्राप्त होणार नाही.त्याकरीता नियम क्र.४ व ५ मधील नियमांचे पालन करणे आवश्यक राहील.

६. **सभासदत्व रद्द होणे -**

कोणताही सभासद कायदेशिर गुन्हेगार असेल,सभासद वर्गणी दिली नसेल,राजीनामा दिल्यास व तो राजीनामा कार्यकारी मंडळाने मंजूर केल्यास,मयत झाल्यास,देश सोडून गेला असेल,व्यसनी किंवा गैरवर्तणूक करीत असेल, संस्थेला हानी किंवा नुकसान पोहचवित असेल, किंवा योग्य कारणावरून कार्यकारी मंडळाने बहुमताने ठराव मंजूर करून काढून टाकल्यास सभासदत्व रद्द झाले असे समजले जाईल. तसेच कोणतेही पुर्व परवानगी शिवाय सतत तीन सभांना गैरहजर राहिल्यास त्याचे सभासदत्व आपोआप रद्द समजले जाईल. त्याला वैयक्तिक नोटीस देण्याची आवश्यकता नाही.

७. **सर्वसाधारण सभा,तिचे अधिकार व कार्य -**

सर्व साधारण सभा म्हणजे संस्थेच्या सर्व सभासदांची सभा संस्थेच्या अर्थिक वर्ष संपल्यानंतर तीन महिन्यांचे आत केव्हाही वार्षीक सर्व साधारण सभा घेतली जाईल. सर्व साधारण सभेची कार्य व अधिकार खालील प्रमाणे

अ) मागील सर्व साधारण सभेचा वृत्तांत निर्णय वाचून कायम करणे.

ब) वार्षीक अंदाजपत्रक,जमाखर्च मंजूर करणे,वार्षीक अहवाल मंजूर करणे, कार्यकारीणीच्या अर्थिक धोरणात्मक स्वरूपाचे ठरावांना मान्यता देणे.

क) आयत्या वेळी येणाऱ्या विषयांवर अध्यक्षांचे संमतीने निर्णय देणे.

ड) संस्थेच्या मालमत्ता विक्री संबंधी ट्रस्ट नोंदणी कायदा १९५० ला अनुसरून निर्णय देणे

इ) मुदत संपलेली असल्यास कार्यकारी मंडळाची पुढील पाच वर्षाकरीता निवडणुक करणे व याच वार्षिक सर्वसाधारण सभेत नविन कार्यकारी मंडळातुन पदाधिकारी यांची निवड करणे.

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
|---|---|---|

Scanned with CamScanner

८. **सर्वसाधारण सभेची सुचना व गणसंख्या -**

सर्वसाधारण सभेची सुचना ही प्रत्येक सभासदांस सभेच्या तारखेच्या १५ दिवस अगोदर समक्ष डाकबुकात सही करुन किंवा पोष्टाने किंवा ई-मेल द्वारे देण्यात येईल. त्या सुचनेवर सभेचे ठिकाण, दिनांक,वेळ,विषय लिहीलेली असेल. या सभेत २/३ सभासदांची गणसंख्या आवश्यकता असेल. जर गणपुर्ती पुर्ण झाली नाही तर ती सभा तहकूब ठेवण्यात येईल व एका तासाने सदरची सभा त्याच ठिकाणी सुरू करण्यात येईल. अशा तहकुब झालेल्या सभेस गणपुर्तीची आवश्यकता असणार नाही. मात्र सभेच्या जाहिर विषया व्यतिरिक्त इतर कोणत्याही विषयावर त्या सभेत निर्णय घेतले जाणार नाही.

९. **विशेष सर्वसाधारण सभा व तिचे कार्य -**

काही महत्वाच्या व तातडीच्या कामासाठी विशेष सर्व साधारण सभा घेतली जाईल. त्यास विशेष सर्व साधारण सभा संबोधले जाईल. या सभेस २/३ सभासदांची गणसंख्या आवश्यक राहील. या सभेस १५ दिवसांची नोटीस समक्ष डाकबुकात सही करुन किंवा पोष्टाने किंवा ई-मेल द्वारे देण्यात येईल.

अ. सर्वसाधारण सभेची जी कर्तव्य व अधिकार असेल ती विशेष सर्वसाधारण सभेस राहतील.

ब. त्या शिवाय ज्या महत्वांच्या कामासाठी ही सभा बोलविली आहे. त्या बाबतचा निर्णय घेणेचे संपुर्ण अधिकार या सभेस राहतील.

१०. **संस्थेचे कार्यकारी मंडळाची रचना -**

अ) संस्थेचे कार्यकारी मंडळ हे कमीत कमी ७ व जास्तीत जास्त २१ सदस्यांचे असेल. या सदस्य संख्येत वाढ किंवा घट करावयाची असल्यास याबाबतचा विषयास वार्षिक सभेत प्रथम मंजुरी घेण्यात यावी व त्यानंतर कार्यकारी मंडळाची निवड करण्यात यावी.

ब) संस्थेच्या फक्त संस्थापक व आजीवन सभासदांस कार्यकारी मंडळाच्या निवडणुकीत उभे राहणे तसेच मतदान करता येवुन सहभाग घेता येईल.

क) संस्थेच्या कार्यकारी मंडळात खालील प्रमाणे पदाधिकारी असतील.
अध्यक्ष-१, उपाध्यक्ष-१, सचिव-१ व इतर सदस्य असतील. संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत प्रथम कार्यकारी मंडळाची निवड करण्यात येईल, त्यानंतर याच वार्षिक सर्वसाधारण सभेत फक्त नविन निवडुण आलेल्या कार्यकारी मंडळाने आपआपसांत बहुमताने पदाधिकारी यांची निवड करावी. यासाठी नविन कार्यकारी मंडळाच्या सभेची आवश्यकता नाही.

११. **कार्यकारी मंडळाचा कार्यकाळ व निवडणूकीची पध्दत :-**

पहिले कार्यकारी मंडळ पाच वर्षाचे असेल. संस्थेची कार्यकारी मंडळाची दर ५ वर्षांनी वार्षिक सर्वसाधारण सभेत प्रथम कार्यकारी मंडळाची निवड करण्यात येईल, त्यानंतर याच वार्षिक सर्वसाधारण सभेत फक्त नविन निवडुण आलेल्या कार्यकारी मंडळाने आपआपसांत बहुमताने पदाधिकारी यांची निवड करावी. यासाठी नविन कार्यकारी मंडळाच्या सभेची आवश्यकता नाही. सदरची निवडणूक ही सर्वसाधारण सभेत दर ५ वर्षांनी गुप्त मतदान पध्दतीने घेण्यात येईल. संस्थेच्या संस्थापक व आजीवन सभासदांनाच निवडणुकीचे उभे राहण्याचे तसेच मतदान करण्याचे अधिकार राहतील.

अध्यक्ष     उपाध्यक्ष     सचिव

Scanned with CamScanner

## १२. कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी व त्यांची कार्यप्रणाली -

कार्यकारी मंडळात खालील प्रमाणे पदाधिकारी असतील यांत अध्यक्ष-१, उपाध्यक्ष-१, सचिव-१, व इतर सभासद असतील. त्या अन्वये कार्यकारी मंडळाचे कार्य खालील प्रमाणे -

**अध्यक्ष -**

१. संस्थेच्या सर्व सभा व्यवस्थित चालविणे व त्याचे संचालन करणे,सभा बोलविणे,

२. संस्थेच्या कारभारावर संपुर्ण नियंत्रण ठेवणे.

३. सभेत समसमान मते पडल्यास एक निर्णायक ज्यादा मत देणे.

४. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांकडून संस्थेच्या हिताची कामे करून घेणे.

५. एखादी जागा काही कारणास्तव रिक्त झाल्यास योग्य निर्णय घेणे

**उपाध्यक्ष -**

१. अध्यक्षांच्या गैरहजेरीत अध्यक्षांची सर्व कामे करणे.

२. अध्यक्षांना त्यांच्या कामात मदत करणे.

**सचिव -**

१. संस्थेचे सर्व प्रकारचे पत्र व्यवहार पाहणे.

२. नियमाप्रमाणे लागणारे आवश्यकतेनुसार सर्व प्रकारचे रजिष्टर ठेवणे.

३. सभांचे सर्व ठराव अंमलात आणणे.

४. संस्थेचे हिशोब पडताळून पाहणे तशा स्वाक्षऱ्या करणे.

५. संस्थेच्या सेवक वर्गाच्या अडी-अडचणी समजून घेणे व त्यासंबंधी कार्यकारी मंडळात ठराव मांडणे व त्या विषयी योग्य ते निर्णय घेणे.

६. अध्यक्षांच्या परवानगीने व त्यांच्या सहीने सर्व सभांच्या कार्यक्रम पत्रिका पाठविणे.

७. कार्यकारी मंडळाने ठरविल्यास त्यांच्या वतीने संस्थेच्या दस्तऐवजांवर सह्या करणे.

**सभासद -**

१. कार्यकारी मंडळाच्या व सर्वसाधारण सभेत उपस्थित राहणे. निवडणूकीचे वेळी मतदान करणे.

२. संस्थेच्या कामकाजात इतर पदाधिकाऱ्यांना मदत करणे.

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
|---|---|---|

Scanned with CamScanner

**१३. कार्यकारी मंडळाची सभा, त्याची सुचना व गणसंख्या –**

कार्यकारी मंडळाची सभा ही जास्तीत जास्त तीन महिन्यातून एकदा घेण्यात येईल. अशा प्रकारे एका वर्षात कमीत कमी चार सभा घेण्यात येतील. प्रत्येक कार्यकारी मंडळाची सभेची सुचना ७ दिवस अगोदर समक्ष डाकबुकात सही करुन किंवा पोष्टाने किंवा ई–मेल द्वारे देण्यात येईल. सभेला कार्यकारी मंडळातील सदस्यांची गणसंख्या ही २/३ असणे आवश्यक राहील. पण गणसंख्याच्या अभावी सभा जर तहकुब झाली तर झालेली सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी ठरलेल्या वेळेनंतर एका तासाने घेण्यात येईल. अशा तहकुब सभेस गणपुर्तीची आवश्यकता राहणार नाही. मात्र अशा सभेस विषय पत्रिके शिवाय इतर कोणत्याही विषयावर चर्चा होणार नाही. अथवा निर्णय घेतले जाणार नाही.

**१४. मागणीची/तातडीची सभा ,सभेची सुचना व गणसंख्या –**

तसेच महत्वाच्या अथवा तातडीच्या कामासाठी कार्यकारी मंडळाची सभा बोलविण्यात येईल. त्यासाठी कमीत कमी १/३ सभासदांनी अध्यक्षांकडे लेखी मागणी करणे आवश्यक आहे. तिला मागणीची सभा किंवा तातडीची सभा असे संबोधण्यात येईल. त्या सभेला पाच दिवसांची नोटीस अथवा सूचना पोष्टाने अथवा समक्ष देण्यात येईल या सभेला गणसंख्येचे नियम हे कार्यकारी मंडळाच्या सभेप्रमाणेच असतील. ही तातडीची सभा बोलविण्याचा अधिकार अध्यक्षांचा राहील. सदर सभा अध्यक्षांनी १५ दिवसांच्या आत न बोलविल्यास मागणी करणारे सभासद अशी सभा बोलावतील.

**१५. कार्यकारी मंडळाचे निवडणूकीचे नियम –**

अ. कार्यकारी मंडळाची निवडणुक सर्व साधारण सभेत दर पाच वर्षांनी गुप्त मतदान पध्दतीने घेण्यात येईल.

ब. संस्थेच्या संस्थापक व आजीवन सभासदांनाच निवडणुकीत उभे राहण्याचे तसेच मतदान करण्याचे अधिकार राहतील.

क. संस्थेची कार्यकारी मंडळाची दर ५ वर्षांनी वार्षिक सर्वसाधारण सभेत प्रथम कार्यकारी मंडळाची निवड करण्यात येईल,त्यानंतर याच वार्षिक सर्वसाधारण सभेत फक्त नविन निवडुण आलेल्या कार्यकारी मंडळाने आपआपसांत बहुमताने पदाधिकारी यांची निवड करावी.

**१६. कार्यकारी मंडळातील रिक्त पदे भरण्याबाबत –**

कार्यकारी मंडळातील पद अथवा जागा नियम क्रमांक ६ प्रमाणे वा पुढील कारणाने सभासद मृत्यूमुळे,राजीनामा दिल्यामुळे व तो कार्यकारी मंडळाने मंजूर केल्यास,वेडा झाल्यास,बदली झाल्यास कार्यकारी मंडळातील एखादे पद रिक्त झाल्यास अशी रिक्त जागा ही कार्यकारी मंडळाने सभेत उर्वरित कार्यकारी मंडळाने संस्थेच्या संस्थापक तसेच आजीवन सभासदांतुन बहुमताने भरुन काढावी. अशा कार्यकारी मंडळाच्या सभेस संभाव्य सभासदास निमंत्रीत सभासद म्हणुन बोलविता येईल. तसेच नविन नियुक्त सभासदाचा कालावधी हा कार्यकारी मंडळाच्या उर्वरित कालावधीपुरता राहील. असे रिक्त पद वा जागा तीन महिन्यांत भरली नाही तर मा. सहा. धर्मदाय आयुक्त सो. जळगांव विभाग,जळगांव यांना भरणेचा अधिकार राहील.

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
|---|---|---|

Scanned with CamScanner

१७) **कार्यकारी मंडळाचे अधिकार व कर्तव्य –**

अ) संस्थेच्या उद्देशाकरीता निधी जमा करणे, वाढविणे,तिचा विनियोग करणे, योग्य अशी गुंतवणूक करणे, देणग्या शासकिय व निमशासकिय अनुदान स्विकारणे.

ब) ट्रस्ट कायदा १९५० व त्या खालील नियमांना अनुसरून संस्थेच्या उद्देश पुर्तीसाठी कर्ज घेणे व अनामत स्विकारणे.

क) दैनंदिन खर्चाचे अंदाजपत्रक मंजूर करणे व त्या खालील रक्कम मंजूर करणे व खर्चास वेळोवेळी मंजूरी देणे.

ड) ट्रस्ट नोंदणी कायदा १९५० च्या नियमांना अधिन राहून संस्थेच्या नावाने जंगम व स्थावर मिळकत खरेदी करणे व त्यावर इमारती बांधणे, गहाण ठेवणे व त्या भाड्याने देणे व त्यांचा उपयोग करून संस्थेच्या उदिष्टाची पुर्ती करणे.

इ) संस्थेच्या उपक्रमांच्या व योजनांच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक त्या समित्या वा पोटसमित्या नेमणे. त्यांची सदस्य संख्या कार्यकाल, कार्यक्षेत्र, कार्यपध्दती व अर्थव्यवस्था वगैरे सर्व ठरविणे. तसेच त्या समित्यांमध्ये सर्व सदस्यांमधून योग्य व अनुभवी व तज्ञ व्यक्तीस नेमणे. नोकर वर्ग नेमणे.

ई) कार्यकारी मंडळावर मुदती आधी जागा रिकामी झाल्यास ती बहुमताने भरून काढणे.

फ) संस्थेच्या अंतर्गत चालणाऱ्या इतर शाखांवर नेमणूक करणे.

ग) सनदी लेखापाल (ऑडीटर) यांची नेमणूक करणे.

ह) तसेच ट्रस्ट नोंदणी कायदा १९५० व संस्था नोंदणी कायदा १८६० (२१) ला अनुसरून उद्देश पुर्तीसाठी कार्य करणे.

१८. **संस्थेची निधी मिळकती व विनीयोग –**

संस्थेच्या निधी शासकिय व निमशासकिय अनुदाने स्विकारून देणग्या गोळा करण्यात येतील तो सातत्याने वाढविण्याचा प्रयत्न करण्यात येईल. निधी व मिळकतीचा विनियोग संस्थेच्या उदिष्टपुर्तीसाठी करण्यात येईल.

१९. **उदिष्टनिहाय खर्चाची तरतूद –**

संस्थेने ज्या उद्देशाने रक्कम गोळा केली असेल त्या उद्देशांवर ती रक्कम त्यानुसार खर्च करण्यात येईल. अन्यथा संस्थेच्या इतर उद्देशांवर खर्च करण्यात येईल. त्यात उद्देशांचे गरजेनुसार व काळाप्रमाणे व परिस्थितीस अनुसरुन यांत बदल केला जाईल. या बाबतची सुचना म.सहा.धर्मदाय आयुक्त यांचे कार्यालयांत वार्षिक तपासनी अहवाला बरोबर दिला जाईल.

२०. **कर्ज किंवा अनामत या संबंधीची तरतूद –**

संस्थेचे उद्दिष्ट पुर्तीसाठी सवार्वजनिक न्यास नोंदणी अधिनियम १९५० चे कलमास अधिन राहून कार्यकारी मंडळाचे ठरावानुसार अध्यक्ष व सेक्रेटरी संस्थेस लागणारी कर्ज घेतील व अनामत स्विकारतील व या कर्जाचा वा अनमात योग्य तो वापर झाला किंवा नाही याची जबाबदारी कार्यकारी मंडळावर राहील. कर्ज व अनामत मा. धर्मदाय सह आयुक्त नाशिक यांची पुर्व परवानगीने घेण्यात येतील.

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |

Scanned with CamScanner

**२१. स्थावर मालमत्ता खरेदी विक्री करणे बाबतची तरतुद -**

सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे अधिन राहून संस्था स्थावर मालमत्ता खरेदी वा विक्री करेल अथवा भाड्याने घेईल व देईल अथवा गहाण ठेवेल वा लायसेंसिंग पध्दतीने देईल. या मिळकतीपासून मिळणारे उत्पन्न हे संस्थेच्या अधिन राहून उदिष्ट पुर्तीसाठी वापर करण्यात येईल. मा.धर्मदाय सह आयुक्त नाशिक यांचे पुर्व परवानगीशिवाय संस्थेची स्थावर मालमत्ता विक्री करता येणार नाही. तसेच स्थावर मालमत्ता खरेदी केल्यानंतर महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० च्या कलम २२ नुसार ३ महीनेचे आंत स्थावर मिळकतीची नोंद घेणेबाबतचा बदल अर्ज कार्यालयांत दाखल करण्यात येईल.

**२२. बँक खाते व व्यवहार -**

संस्थेकडे येणाऱ्या निधीपैकी रू. १०००/- इतकी रक्कम हातात ठेवून बाकीची रक्कम कोणत्याही राष्ट्रीयकृत/शेड्युल बँकेत खाते उघडून संस्थेच्या नांवाने ठेवता येईल. बँकेचे खात्यातील व्यवहार हे संस्थेचे अध्यक्ष व सचिव यांच्या संयुक्त नावाने खाते उघडले जाईल. यात अध्यक्ष व सचिव यांची सही ही आवश्यक सही राहील.

**२३. सभासदांची यादी ठेवण्याची पध्दत -**

१८६० च्या संस्था नोंदणी अधिनियमातील कलम १५ अ प्रमाणे संस्थेचे जे सभासद असतील त्याची एक यादी सन १९७१ चे संस्था नोंदणी महाराष्ट्र नियमातील कलम १५ प्रमाणे अनुसूची सहाचे नमुन्यात ठेवण्यात येईल. १८६० च्या संस्था नोंदणी अधिनियमातील कलम ४ प्रमाणे व सन १९७१ चे संस्था नोंदणी महाराष्ट्र नियम ७ प्रमाणे दरवर्षी कार्यकारी मंडळाची यादी अनुसूची एक नमुन्यात आपले विभागाचे मा. सहाय्यक संस्था निबंधक जळगांव यांचे कार्यालयात पाठवावी लागेल. १८६० च्या संस्था नोंदणी अधिनियम कलम ४ प्रमाणे व सन १९७१ चे संस्था नोंदणी महाराष्ट्र नियम ८ प्रमाणे दरवर्षी संस्थेत नोकरीस लावलेल्या व्यक्तींच्या नोकरी संबंधी अटी बाबतचे विवरण अनुसूची दोन या नमून्यात आपले विभाचे मा. सहा.संस्था निबंधक जळगांव यांचे कार्यालयात पाठवावी लागेल.

**२४. नियम व नियमावलीत बदल करण्याची पध्दत -**

संस्थेच्या ह्या नियमावलीत बदल करणे व नविन नियमांचा अंतर्भाव करणे यासाठी वार्षीक सर्वसाधारण सभेत अथवा विशेष सर्व साधारण सभेत ३/५ मताधिक्याने मंजूरी मिळवावी लागेल. संस्था नोंदणी कायदा १८६० चे कलम १२ व १२ अ नुसार कार्यवाही केली जाईल.

**२५. संस्थेच्या नावात किंवा उद्देशात बदल करण्याची तरतूद -**

संस्थेच्या नावात किंवा उद्देशात बदल करावयाचा असल्यास अथवा दोन संस्थाचे विलीनीकरण करावयाचे असल्यास १८६० च्या संस्था नोंदणी अधिनियमातील कलम १२ व १२ अ प्रमाणे कार्यवाही पुर्ण करावी लागेल.

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
|---|---|---|

Scanned with CamScanner

२६. **विसर्जन करण्या बाबतची तरतुद –**

संस्थेचे कार्य बंद करावयाचे असल्यास ३/५ सभासदांच्या बहुमताने सर्वसाधारण सभेत मंजुरी घ्यावी लागेल. संस्थेचे सर्वप्रकारचे देणे–घेणे बाबतचे व्यवहार पुर्ण करावे लागतील. तसेच संस्थेची शिल्लक असलेली मालमत्ता अन्य दुसऱ्या संस्थेला दान म्हणुन देता येईल. १८६० च्या संस्था नोंदणी अधिनियमातील कलम १३ व १४ प्रमाणे संस्था विर्सजनाची कार्यवाही पुर्ण करावी लागेल.

# दाखला

प्रमाणित करण्यात येते की, **चैतन्य आयुर्वेद महाविद्यालय माजी विद्यार्थी संस्था,साकेगांव, ता.भुसावळ,जि.जळगांव** संस्थेच्या नियमावलीची सत्य प्रत आहे.

| अ.क्र. | नांव | हुद्दा | सही |
|---|---|---|---|
| १. | श्री. महेशकुमार निळकंठ चौधरी | अध्यक्ष | |
| २. | श्री. भुषण पुंडलिक लोखंडे | उपाध्यक्ष | |
| ३. | श्री. प्रसन्ना विलास भालेराव | सचिव | |

ठिकाण –

दिनांक –

Scanned with CamScanner

सत्यमेव जयते

# नोंदणीचे प्रमाणपत्र

(संस्था नोंदणी अधिनियम,१८६०)

(१८६० चा अधिनिअयम २१)

नोंदणी क्रमांक : **जळगाव/0000182/2024**

यादवारे असे प्रमाणित करण्यात येते की, **चैतन्य आयुर्वेद महाविद्यालय माजी विद्यार्थी संस्था साकेगाव तालुका भुसावळ जिल्हा जळगाव**

खालील तारखेस संस्था नोंदणी अधिनियम, १८६० (सन १८६० चा अधिनियम २१) अन्वये योग्यरीत्या नोंदणी करण्यात आली.

तारीख 7 May 2024 रोजी माझ्या सहीनिशी दिले.

---

# Certificate of Registration

(The Societies Registration Act, 1860)

(Act XXI of 1860)

Registration Number: **Jalgaon/0000182/2024**

It is certified that, **CHAITANYA AYURVED MAHAVIDYALAYA MAJI VIDYARTHI SANSTHA SAKEGAON TALUKA BHUSAWAL DISTRICT JALGAON** has this day been duly registered under the Societies Registration Act,1860(XXI of 1860)

Given under my hand this 7 Day of May 2024.

07/05/2024

Assistant Registrar of Society,

सहाय्यक संस्था निबंधक

जळगांव विभाग,जळगांव

Jalgaon

Scanned with CamScanner